# Municipal Corporation Audit
## Half Margin Template

| टिपण क्र. 218 | विषय : रु.25000/- च्या दंडात्मक रकमांबाबत लेखाआक्षेप नोंदविणे. | टिपण दि. 20/11/2015 |
|---|---|---|
| योजना संकेतांक | लेखाशीर्ष | |
| | शिक्षण विभाग | |

सन 2012-2013 चे लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर करण्याबाबत पथकाने यापूर्वी अर्धसमास पत्र क्र. 196 व 197 दि. 13/10/2015 नुसार सूचित करुनही शिक्षण विभागाअंतर्गत प्राथमिक व माध्यमिक शाळा कडील अभिलेखे अद्यापही सादर झाले नसल्याने महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमातील कलम 8 नुसार संबधित मुख्याध्यापकाकडून रु.25000/- दंडात्मक रक्कम वसुलीसाठी लेखाआक्षेप का नोंदविण्यात येऊ नये, याबाबत तात्काळ खुलासा व्हावा, हि विनंती.

**सोबत** - शाळांची यादी
प्रपत्र - 4

2197
21/11/15

सहायक संचालक,
(मनपा लेप,)
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद उपविभाग-3,
मनपा, नागपूर.

| ssued To | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | औडिटी कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|
| 1. मा.आयुक्त, मनपा, नागपूर.<br>2. शिक्षणाधिकारी, (माध्यमिक,प्राथमिक) शिक्षण विभाग. मनपा, नागपूर. | 2012-13 | 2012-13 | 00043963 |

| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DATBNKM6401 | लेखा परीक्षाच प्रमुख संकेतांक | DATABWM6901 |
|---|---|---|---|

आवक तक्रार ... 10

संबंधितांना सूचना द्यावी
21/11

A.E.O
+
shri Koramkar
+
A.S

Shri Meshram
21/11/15

सर्व प्रा. नि. ... 
सर्व. मुख्याध्यापक माध्यमिक / प्राथमिक शाळा
सदर पत्रानुसार ... 
23/11

स्थानिक निधी लेखा परीक्षा प्राधान्य
अत्यंत तातडीचे / कालमर्यादा / महत्वाचे

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
( लेखा व वित्त विभाग )

क्रमांक : क्यू / प्रलेविअ / 2015          दिनांक : 17 / 11 / 2015

Urgent

प्रति,
शिक्षणाधिकारी,
(माध्य./प्राथ.)
महानगरपालिका, नागपूर

विषयः- अभिलेखे उपलब्ध करुन देणे बाबत

संदर्भः- अर्धसमास पत्र क्रं.- 215 दिनांक - 07.11.2015

या सोबत विषयांकित प्रत जोडली आहे. सदरहू पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे त्वरीत कार्यवाही करून स्थानिक निधी लेखा परीक्षा शिबिर नागपूर यांनी मागीतलेली माहिती / अभिलेखे यथाशिघ्र त्यांचे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्याचे करावे ही विनंती.

सहपत्र :- वरील प्रमाणे

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी
महानगरपालिका, नागपूर

# Municipal Corporation Audit
## Half Margin Template

5369/RCII
9/11/15

| 215 | अभिलेखे उपलब्ध करून देणेबाबत. | 7/11/2015 |
|---|---|---|
| योजना संकेतांक | योजनेचे नाव | |
| | | |
| शाखा संकेतांक | टिपण प्रकार : आक्षेप / माहिती /दोन्ही | गुंतलेली रक्कम |
| 26 | माहिती | 13643718 |

Hon. MCA
CAFO

सन 2012-2013 चे लेखापरीक्षण सुरु असून अर्धसमास पत्र क्र. 180 दिनांक- 09/10/2015 नुसार कळविले असता शिक्षण विभागा अंतर्गत माध्यमिक व प्राथमिक शाळांचे अभिलेखे लेखापरिक्षण पथकास अद्याप उपलब्ध करून देण्यात आले नाही. तरी मनपा अंतर्गत संपूर्ण शाळेचे, मुख्यालयाचे, शालेय पोषण आहार, गणवेश वाटप, शाळा भाडे, CAL &CEP Project ईत्यादी संबंधित संपूर्ण अभिलेखे 3 दिवसांचे आत लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात यावे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमातील कलम 6 नुसार दस्ताऐवज सादर करण्यास किंवा संबंधित व्यक्तीला लेखापरिक्षणासाठी हजर राहण्यास फर्माविण्याचा अधिकार लेखापरिक्षकास आहे. अर्धसमास पत्राचे उत्तर अभिलेख्यासह तीन दिवसाच्या आत लेखापरीक्षण पथकास सादर करण्याबाबत संबंधित जबाबदार कर्मचारी / अधिकारी यांना आदेश व्हावेत जर यामध्ये विलंब झाल्यास सन 2012-13 चे लेखापरीक्षण अहवालात या बाबत आक्षेप नोंदविण्यात येईल, त्यानंतर सादर करण्यात आलेल्या अनुपालनाची तपासणी करण्यात येणार नाही.

तसेच अर्धसमास पत्राची माहिती सादर न करणे हि फार गंभीर बाब असून महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे सुधारणा अधिनियमचे कलम 7 नुसार प्रत्येक अभिलेख्यासह रु.25000/- पर्यंतच्या दंडाच्या शिक्षेचे प्रावधान असल्यामुळे आपले विशेष लक्ष वेधण्यात येत आहे.

सहायक संचालक,
(मनपा.लेप,)
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
औरंगाबाद उपविभाग-3,
मनपा, नागपूर.**करिता**

Municipal Corporation Audit
Half Margin Template

| ssued To | लेप. वर्ष पासून (yyyy-yyyy+1) | लेप. वर्षा पर्यंत (yyyy-yyyy+1) | औडिटी कार्यालय संकेतांक |
|---|---|---|---|
| 1. मा.आयुक्त, मनपा, नागपूर. 2. शिक्षणाधिकारी, (माध्यमिक,प्राथमिक) शिक्षण विभाग. मनपा, नागपूर. | 2012-13 | 2012-13 | 00043963 |

| | | | |
|---|---|---|---|
| लेखा परीक्षकाचा संकेतांक | DLFSRWF8901 | लेखा परीक्षा प्रमुखाचा संकेतांक | DATPFDM7301 |